माझा लोककलेशी, लोकनाटयाशी संबंध आला तो दादा कोंडके यांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या लोकनाट्यामुळे. या लोकनाट्यातल्या ७५० प्रयोगातून मी गायले. 'विच्छा' मध्ये तर कधी-कधी मी नऊवारी साडी नेसून दादांबरोबर गवळणही गात असे. 'विच्छा' मधला लावणीचा माझा प्रवास, बैठकीची लावणी गाण्यापर्यंत पोहोचला. दादांसारखा उत्स्फूर्त, लवचिक, हजरजबाबी शाहीर मी पाहिला नाही.

या लोकरंगभूमीमुळेच मला राजा मयेकर, शाहीर साबळे, सुहास भालेकर, दादू इंदूरीकर, काळूबाळू, विठाबाई नारायणगावकर या श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कलावतांचा परिचय झाला. त्यांच्याकडून मला शिकायला मिळालं. ती शिदोरी मला आजवर पुरत आली आहे. 'विच्छा' मधल्या लावण्या मी आजही गाते व स्वतः त्याचा आनंद घेते.

आपल्याकडच्या लोकरंगभूमीचा, लोककलांचा आवश्यक तेवढा अभ्यास अजूनही झालेला नाही. हा एक महासागर आहे, ज्याचा तळ शोधण्याकरिता कदाचित अनेक जन्म घ्यावे लागतील. मला वाटतं नाट्यपरिषदेनंच एक स्वतंत्र विभाग लोकरंगभूमीसाठी स्थापन करावा, ज्यात अनेक नव्या जुन्या शाहीर, कलावंतांना सामील करून घ्यावे व पुन्हा एकदा या लोककलेला ऊर्जितावस्था प्राप्त करून द्यावी...

## व्यावसायिक – पद्य (संगीत) नाटक – गद्य नाटक

पद्य (संगीत) आणि गद्य नाटक या रंगभूमीवरच्या अनेक व्यावसायिक नाटकातून कामे करण्याची मला संधी मिळाली त्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजते. आजमितीस व्यावसायिक रंगभूमीवर मी केलेल्या प्रयोगांची एकूण संख्या साडेचार हजार आहे.

महाराष्ट्रातील अग्रगण्य नाट्यसंस्थांच्या अनेक नाटकातून भूमिका करण्याची मला संधी मिळाली. उदा.-ललितकलादर्श, गोवा हिंदू असोसिएशन, नाट्यसंपदा, रंगशारदा, कलावैभव, सुयोग. अनेक दिग्गज दिग्दर्शकांच्या हाताखाली मी काम केले. उदा. नानासाहेब फाटक, पु.ल.देशपांडे, पुरूषोत्तम दारव्हेकर, कांती मंदिया, मामा तोरडमल, अरविंद ठक्कर, विजय केंकरे, नंदकुमार